**ठाणे महानगरपालिका, ठाणे.**

महापालिका सचिव कार्यालय,
दिनांक : १७/०२/२०१०

**ठाणे महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त**
**सभा क्रमांक १४, दिनांक १७/०२/२०१०**
**सभा सूचना क्रमांक ९, दि.०६/०२/२०१०**
**सभा क्रमांक १, दि.१७/०२/२०१०**

ठाणे महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा शनिवार दिनांक १७/०२/२०१० रोजी सभा सूचना क्रमांक ९, दिनांक ०६/०२/२०१० रोजीच्या विषयपत्रिकेवर विचारविनिमय करण्याकरिता ठाणे महानगरपालिकेच्या ''भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सभागृहात'' सकाळी ठिक ११.०० वा. आयोजित करण्यात आली होती.

सदर सभेच्या अध्यक्षस्थानी मा.महापौर श्री.अशोक बारकू वैती हे उपस्थित होते.

**सदर सभेस उपस्थित सदस्य खालील प्रमाणे.**

१. श्री.अशोक बारकू वैती - महापौर
२. श्री.मनोज विठ्ठल लासे - उपमहापौर

| | |
|---|---|
| ३. श्री.पाटील बाळकृष्ण पुंडलिक | ४. सौ.कविता सुरेश पाटील |
| ५. श्री.मधुकर रामचंद्र पावशे | ६. श्री.आनंदा तुकाराम कसरे |
| ७. सौ.मिनाक्षी राजेंद्र शिंदे | ८. श्री.रामचंद्र लहू फडतरे |
| ९. श्री.दिनेश मनोहर पाथरे | १०. सौ.ताई मारुती भोंडवे |
| ११. श्री.राजेश रामचंद्र ठाकूर | १२. श्री.हणमंत ज्ञानू जगदाळे |
| १३. सौ.द्रौपदाबाई जगदिश इंदिसे | १४. सौ.अनिता अशोक सावंत |
| १५. श्री.नागसेन गंगाराम इंदिसे | १६. श्री.सुधाकर वामन चव्हाण |
| १७. सौ.वनिता गंगाराम इंदिसे | १८. सौ.कल्पना हरिश्चंद्र पाटील |
| १९. श्री.हरिश्चंद्र श्रीपत पाटील | २०. श्री.संजय देवराम भोईर |
| २१. श्री.देवराम लक्ष्मण भोईर | २२. सौ.महेश्वरी संजय तरे |
| २३. सौ.शारदा दादू पाटील | २४. श्री.राम हरि एगडे |
| २५. सौ.परिषा प्रताप सरनाईक | २६. श्री.सुधीर प्रल्हाद बर्गे |
| २७. श्री.दिलीप चंद्रकांत बारटक्के | २८. सौ.केवलादेवी रामनयन यादव |
| २९. श्री.सुरेश चंदू कांबळे | ३०. सौ.एकता एकनाथ भोईर |
| ३१. श्री.पद्माकर संभाजी कांबळे | ३२. श्री.दशरथ बाबुराव पालांडे |
| ३३. श्री.संतोष वसंत वडवले | ३४. कु.योगिता रमेश वैती |

३५. श्री.राजन बाबुराव विचारे
३६. श्री.संजय प्रभाकर सोनार
३७. श्री.अशोक राजाराम राऊळ
३८. श्री.सुधीर विष्णु कोकाटे
३९. श्री.संतोष गजानन साळवी
४०. श्री.मुल्ला नजीब सुलेमान
४१. श्रीमती मुल्ला फातिमा अंजुम मुदम्मद आसिफ
४२. सौ.रुपाली रमेश कदम
४३. श्री.मिलिंद माधव पाटणकर
४४. श्री.उमेश काशिनाथ पाटील
४५. श्री.दिनेश दाजी कांबळे
४६. सौ.अपर्णा मिलिंद साळवी
४७. श्रीमती सुरेखा सुरेश खातू
४८. श्री.अशोक नारायण भोईर
४९. श्री.मिलिंद भारत पाटील
५०. सौ.शांता शामजी सोलंकी
५१. श्री.बिष्ट महादिप उर्फ मुन्ना
५२. सौ.स्मिता सुभाष इंदुलकर
५३. सौ.सुहासिनी (प्रतिभा) सुनिल लोखंडे
५४. श्री.नारायण शंकर पवार
५५. श्री.विलास शिवराम सामंत
५६. संजय संतु वाघुले
५७. सौ.अनिता हिराकांत फर्डे
५८. सौ.स्मिता मधुकर देशमुख
५९. श्री.जनार्दन कृष्णा खेतले
६०. श्री.हरिष काशिनाथ वैती
६१. श्री.मधुकर विठ्ठल होडावडेकर
६२. सौ.सुनिता (ताई) सुरेश सावंत
६३. श्री.शैलेश तुकाराम शिंदे
६४. सौ.प्रभावती माणिक पाटील
६५. श्री.जितेंद्र प्रभाकर वाघ
६६. सौ.निता मदन कदम
६७. श्री.मनोज तुकाराम शिंदे
६८. श्री.संगिता चंद्रगुप्त घाग
६९. श्री.चंद्रगुप्त सिताराम घाग
७०. श्री.घनश्याम शिवाजी कणसे
७१. श्री.संजय भाऊराव मोरे
७२. श्री.रविंद्र सदानंद फाटक
७३. श्री.शैलेश तुकाराम सावंत
७४. सौ.संगिता मिलिंद बनकर
७५. श्री.पांडुरंग गोविंद पाटील
७६. श्री.भरत अभिमन्यु चव्हाण
७७. श्री.लक्ष्मण (लच्छू) चंदूमल टिकमानी
७८. श्री.प्रकाश हरिश्चंद्र राऊत
७९. श्री.राजेश आत्माराम खारकर
८०. श्री.सुभाष आत्माराम खारकर
८१. श्री.सचिन जयराज म्हात्रे
८२. श्री.मनिषा महेश साळवी
८३. श्री.गणेश यशवंत साळवी
८४. श्री.राजेंद्र रमेश साप्ते
८५. सौ.अनिता बालाजी काकडे
८६. श्री.यासिन अय्युब कुरेशी
८७. श्री.सैय्यद अली अशरफ उर्फ भाईसाहेब
८८. श्री.शिवदास नाना भगत
८९. श्री.रमाकांत दशरथ मढवी
९०. सौ.अनिता राजन किणे
९१. श्री.सुधीर रामचंद्र भगत
९२. सौ.स्वाती महेंद्र कोमुर्लेकर
९३. श्री.महेंद्र वसंतराव कोमुर्लेकर
९४. श्रीमती नाईक हफीजा नसरुद्दीन
९५. श्री.अन्सारी असलम सलीम
९६. श्रीमती खान शगुफ्ता नसीर
९७. श्रीमती रझिया इकबाल शेख
९८. श्री.सुभाष गणू भोईर
९९. श्री.दिलीप रतन म्हात्रे
१००. श्री.नरेश गणपत म्हस्के
१०१. श्री.अनिल गजानन सावे
१०२. श्री.सनी वर्गीस थॉमस
१०३. श्री.मिलिंद मनोहर साळवी

**सदर सभेस अनुपस्थित असलेले सदस्य खालील प्रमाणे.**

| | |
|---|---|
| १. श्री.संजय रामचंद्र तांडेल | २. श्री.राजेश नामदेव सारंग |
| ३. श्री.जयनाथ यशवंत पुर्णेकर | ४. श्री.रविंद्र माणिक पाटील |
| ५. श्रीमती छाया मनोहर राव | ६. श्रीमती राधा फत्तेबहादूर सिंह |
| ७. सौ.अपर्णा नंदकुमार यादव | ८. सौ.अनिता सुनिल गौरी |
| ९. सौ.प्रमिला मुकुंद केणी | १०. श्री.राम पांडुरंग रेपाळे |
| ११. श्री.राजन नारायण किणे | १२. श्री.डोंगरे सिराज अहमद अली |
| १३. श्रीमती अन्सारी इम्तियाज बानू | १४. श्री.पवन काशिनाथ कदम |

**सदर सभेस रजेवर असलेले सदस्य खालील प्रमाणे.**

| | |
|---|---|
| १. सौ.सुजाता भास्कर पाटील | २. सौ.राऊत आशरीन इब्राहिम |

( छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळयास मा.महापौर पुष्पहार अर्पण करतात.)

( तद्नंतर राष्ट्रगीताने सभेस सुरुवात होते.)

---------------------

मा.महापालिका सचिव :-

सभेचा अजेंडा वाचून दाखवितात व सभेस सुरुवात करतात.

महापौर महोदय, खालील प्रमाणे सन्मा.सदस्यांनी आजच्या सभेस गैरहजर असल्याबाबत लेखी कळविले आहे.

१) सन्मा.सदस्या सौ.सुजाता भास्कर पाटील
३) सन्मा.सदस्या सौ.राऊत आशरीन इब्राहिम

रजा मंजूर.......

महापौर महोदय, तारांगण येथील दुर्घटनेत मृत्युमुखी पडलेल्या अग्निशमन विभागातील कर्मचा-यासाठी सन्मा.सदस्यांच्या एक महिन्याचे वेतनाचा धनादेश व महापालिकेच्या अधिकारी व कर्मचारी यांचे एक दिवसाचे वेतनामधून जमा झालेल्या निधीचा धनादेश संबंधितांच्या नातेवाईकांना देण्यात येत आहे. मी त्यांची नांवे वाचून दाखविते.

१) श्रीमती मिना ठाणेकर
२) श्रीमती स्नेहा संतोष शिंदे
३) श्रीमती शकुंतला किशोर पाटील
४) श्रीमती कविता तानाजी काळे
५) श्रीमती सुनिता सुरेश जमादार

( मा.महापौर यांचे हस्ते व इतर मा.पदाधिकारी यांचे उपस्थितीत धनादेश देण्यात येतो.)

मा.महापालिका सचिव :-

प्रकरण क्रमांक १६८ वाचून दाखवितात.

| | |
|---|---|
| प्रकरण क्रमांक १६८ :- | मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २०(४) अन्वये मा.स्थायी समितीच्या निवृत्त होणा-या सदस्यांचे जागी कलम २०(५) अन्वये नवीन (आठ) सदस्यांची नेमणूक करणे. १ मार्च २०१० रोजी निवृत्त होणा-या सदस्यांची नांवे पुढील प्रमाणे<br>१) सन्मा.श्री.चंद्रगुप्त सिताराम घाग<br>२) सन्मा.श्री.राजन नारायण किणे<br>३) सन्मा.श्री.सुधाकर वामन चव्हाण<br>४) सन्मा.श्री.पांडुरंग गोविंद पाटील<br>५) सन्मा.श्री.हणमंत ज्ञानू जगदाळे<br>६) सन्मा.श्री.सुभाष आत्माराम खारकर<br>७) सन्मा.श्री.सुधीर विष्णु कोकाटे<br>८) सन्मा.सौ.सुहासिन सुनिल लोखंडे |

मा.महापौर सो. :-

मा.स्थायी समितीच्या रिक्त झालेल्या आठ जागांवर नियुक्त होणा-या सन्मा.सदस्यांची मी नांवे खालील प्रमाणे जाहिर करीत आहे.

शिवसेना, भारतीय जनता पार्टी, बहुजन समाज पार्टी, शिवराज्य पक्ष व अपक्ष या गटाचे गटनेते श्री.राजेंद्र रमेश साप्ते यांनी सुचविलेली नामनिर्देशित सदस्यांची नांवे खालील प्रमाणे.

१) श्री.विलास शिवराम सामंत
२) श्री.गणेश यशवंत साळवी
३) श्री.राम पांडुरंग रेपाळे
४) श्री.संतोष वसंत वडवले
५) श्री.मिलिंद माधव पाटणकर

तसेच लोकशाही आघाडची गटनेते श्री.अशोक राजाराम राऊळ यांनी सुचविलेली नामनिर्देशित सदस्यांची नांवे खालीलप्रमाणे.

१) श्री.शैलेश तुकाराम सावंत
२) श्री.भरत अभिमन्यु चव्हाण
३) श्री.हरिष काशिनाथ वैती

प्रकरण क्रमांक १६८ मंजूर........

मा.महापालिका सचिव :-

प्रकरण क्रमांक १६९ वाचून दाखवितात.

| | |
|---|---|
| प्रकरण क्रमांक १६९ :- | मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २५(५) अन्वये मा.परिवहन समिती सदस्य प्रत्येक दुस-या वर्षाचा कालावधी पूर्ण केला असल्याने पुढील सदस्य १ मार्च २०१० रोजी मध्यान्होत्तर निवृत्त होत आहेत. कलम २५(७) अन्वये रिक्त जागी नेमणूका करावयाच्या आहेत. निवृत्त होणा-या सदस्यांची नांवे पुढीलप्रमाणे.<br>१) सन्मा.श्री.सुरेश माधवराव मोहिते<br>२) सन्मा.श्री.रामदास भाऊसाहेब तांबे<br>३) सन्मा.श्री.दत्तात्रय विष्णू माने<br>४) सन्मा.प्रकाश शांताराम कदम<br>५) सन्मा.सौ.सुजाता विजय घाग<br>६) सन्मा.श्री.भरत अभिमन्यु चव्हाण |

मा.महापौर सो. :-

मा.परिवहन समितीच्या रिक्त झालेल्या आठ जागांवर नियुक्त होणा-या सन्मा.सदस्यांची मी नांवे खालील प्रमाणे जाहिर करीत आहे.

शिवसेना, भारतीय जनता पार्टी, बहुजन समाज पार्टी, शिवराज्य पक्ष व अपक्ष या गटाचे गटनेते श्री.राजेंद्र रमेश साप्ते यांनी सुचविलेली नामनिर्देशित सदस्यांची नांवे खालील प्रमाणे.

१ ) श्री.प्रकाश शांताराम कदम
२ ) श्री.काशिराम गोविंद राऊत
३ ) श्री.शैलेश धनाजी भगत
४) श्री.अजय जयराम जोशी

तसेच लोकशाही आघाडची गटनेते श्री.अशोक राजाराम राऊळ यांनी सुचविलेली नामनिर्देशित सदस्यांची नांवे खालीलप्रमाणे.
१ ) श्री.भरत जगजीवन ठक्कर
२ ) श्री.संतोष दत्ताराम पाटील

प्रकरण क्रमांक १६९ मंजूर.......

मा.महापालिका सचिव :-

प्रकरण क्रमांक १७४ वाचून दाखवितात.

प्रकरण क्रमांक १७४ :- स्वातंत्र्यवीर वि.दा. सावरकर तरण तलाव येथील शुल्क दर वाढीनुसार आकारणी करणे मा.सर्वसाधारण सभेची कार्योत्तर मान्यता मिळणेबाबत.

प्रकरण क्रमांक १७४ मंजूर.....

प्रकरण क्रमांक १७५ :- स्लॉटर फी, अनुज्ञप्ती फीमध्ये नवीन दराने वाढ करणे मा.सर्वसाधारण सभेची मान्यता मिळणेबाबत.

प्रकरण क्रमांक १७५ मंजूर.....

प्रकरण क्रमांक १८१ :- ठाणे महानगरपालिकेच्या महात्मा फुले भाजी मंडई व गांवदेवी भाजी मंडई येथील बाजार वसुलीचे दर निश्चित करणेस मा.सर्वसाधारण सभेची मान्यता मिळणेबाबत.

प्रकरण क्रमांक १८१ मंजूर.....

प्रकरण क्रमांक १९८ :- ठाणे महानगरपालिकेमार्पुत विविध सेवा संस्थांना डक्ट/केबलसाठी आकारण्यांत येणा-या रस्ता फोड फी दरांत सुधारण करणेबाबत मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेसाठी सादर

प्रकरण क्रमांक १९८ मंजूर.....

प्रकरण क्रमांक २१४ :- छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयाच्या रक्तपेढी विभागासाठी ''रक्त घटक विघटन'' (Blood Component Separate Unit) उपकरणे खरेदी करण्यास मा.सर्वसाधारण सभेची कार्योत्तर मान्यता मिळणेबाबत.

प्रकरण क्रमांक २१४ मंजूर.....

प्रकरण क्रमांक २१५ :- ठाणे महानगरपालिकेचे सर्व दवाखाने, रुग्णालये या ठिकाणी असलेल्या प्रयोगशाळांना (Biochemestry analysers & Cell Counter) पुरवठा करणेस मा.सर्वसाधारण सभेची कार्योत्तर मान्यता मिळणेबाबत.

प्रकरण क्रमांक २१५ मंजूर.....

प्रकरण क्रमांक २१६ :- ठाणे महानगरपालिकेचे सर्व दवाखाने, रुग्णालयांसाठी पाणी पिण्याची सुविधा उपलब्ध होण्यासाठी वॉटल कुलर खरेदी करण्यास मा.सर्वसाधारण सभेची कार्योत्तर मान्यता मिळणेबाबत.

प्रकरण क्रमांक २१६ मंजूर.....

प्रकरण क्रमांक २१७ :- छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयाच्या नेत्रपेढी विभागासाठी स्लिट लॅम्प उपकरण खरेदी करण्यास मा.सर्वसाधारण सभेची कार्योत्तर मान्यता मिळणेबाबत.

प्रकरण क्रमांक २१७ मंजूर.....

प्रकरण क्रमांक २१८ :- ठाणे महानगरपालिकेचे सर्व दवाखाने, रुग्णालयांसाठी शस्त्रक्रियेचे साहित्य व सामुग्री खरेदी करण्यास मा.सर्वसाधारण सभेची कार्योत्तर मान्यता मिळणेबाबत.

प्रकरण क्रमांक २१८ मंजूर.....

**मा.महापौर सो. यांचे पूर्वपरवागनीने आयत्यावेळी घेण्यात आलेला विषय**

(श्री.सुहास मधुकर खामकर (शिवछत्रपती पुरस्कार विजेता) यांनी अॅरनॉल्ड अॅम्युच्युअर इंटरनॅशनल बॉडी बिल्डींग चॅम्पियनशिप स्पर्धा अमेरिका येथील कोलम्बस, ओहिओ येथे उपस्थित राहण्यासाठी महानगरपालिकेच्या माध्यमातून रु.१,५०,०००/- इतकी आर्थिक मदत उपलब्ध करुन देणेबाबत.)

आयत्यावेळेचे प्रकरण मंजूर......

मा.महापालिका सचिव :-
१) सन्मा.माजी उपमहापौर श्री.भालचंद्र तांगडी यांच्या निधनाचा दुखवटा ठराव वाचून दाखवितात.
२) पुणे येथे बॉम्बस्फोटात मृत्युमुखी पडलेल्या नागरिकांचा दुखवटा ठराव वाचून दाखवितात.

( सभागृहात श्रध्दांजली अर्पण करण्यात येते.)

( तद्नंतर मा.महापौर सो. दुपारी १.०० वा. सभा तहकूब झाल्याचे जाहिर करतात.)

-------------------------

**प्रकरण क्रमांक १६८ :** मुबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २०(४ )अन्वये मा.स्थायी समितीच्या निवृत्त होणा-या सदस्यांचे जागी कलम २०(५ )अन्वये नविन (आठ) सदस्यांची नेमणुक करणे. १ मार्च २०१० रोजी निवृत्त होणा-या सदस्यांची नांवे पुढीलप्रमाणे.

**१ .सन्मा.श्री.चंद्रगुप्त सिताराम घाग.**

**२ . सन्मा.श्री.राजन नारायण किणे.**

**३ . सन्मा.श्री.सुधाकर वामन चव्हाण.**

**४ . सन्मा.श्री.पांडुरंग गोविंद पाटील.**

**५ . सन्मा.श्री.हणमंत ज्ञानु जगदाळे.**

**६ . सन्मा.श्री.सुभाष आत्माराम खारकर.**

**७.सन्मा.श्री.सुधीर विष्णु कोकाटे.**

**८ . सन्मा.श्रीमती सुहासिनी सुनिल लोखंडे.**

महाराष्ट्र शासनाच्या २७ फेब्रुवारी २००७ रोजीच्या शासन नियमानुसार पक्ष व गटाचे तौलानिक संख्या बळानुसार मा.स्थायी समिती सदस्य पदासाठी नामनिर्देशित केले जातील.

**ठाणे महानगरपालिका ठराव क्रमांक १९१ दिनांक १७.०२.२०१०.**

ठ रा व :

महाराष्ट्र शासनाच्या २००७ सुधारित नियमातील प्रकरण ३ नियम ६ चे ३१ अ ( २ ) नुसार पक्षाच्या संख्याबळाच्या प्रमाणांत नामनिर्देशन पुढीलप्रमाणे,

१. शिवसेना भारतीय जनता पार्टी, बहुजन समाज पार्टी, शिवराज्य पक्ष व अपक्ष या गटाचे गटनेते श्री.राजेंद्र रमेश साप्ते यांनी सुचविलेली नामनिर्देशित सदस्यांची नांवे खालीलप्रमाणे,

**१ . श्री.विलास शिवराम सामंत.**

**२ . श्री.गणेश यशवंत साळवी.**

**३ . श्री.राम पांडुरंग रेपाळे.**

**४ . श्री.संतोष वसंत वडवले.**

५. **श्री.मिलिंद माधव पाटणकर.**

२. लोकशाही आघाडीचे गटनेते श्री.अशोक राजाराम राऊळ यांची सुचविलेली नामनिर्देशित सदस्यांची नावे खालीलप्रमाणे,

**१ . श्री.शैलेश तुकाराम सावंत.**

**२ . श्री.भरत अभिमन्यु चव्हाण.**

**३ . हरिष काशिनाथ वैती.**

**४ .**

ठाणे महानगरपालिकेच्या स्थायी समिती सदस्य पदाकरीता वरील आठ सदस्य नामनिर्देशित सदस्यांची नांवे स्थायी समितीसदस्य म्हणून घोषणा करण्यांत येत आहे.

सूचक : श्री.पांडुरंग गोविंद पाटील. अनुमोदक : श्री.हणमंत ज्ञानु जगदाळे.

**सर्वानुमते मंजूर.**

सही/- अशोक बारकू वैती.
महापौर,
ठाणे महानगरपालिका,ठाणे.

**प्रकरण क्रमांक १६९ :** मुबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २५(५ )अन्वये मा.परिवहन समिती सदस्य प्रत्येक दुस-या वर्षाचा कालावधी पुर्ण केला असल्याने पुढील सदस्य १ मार्च २०१० रोजी मध्यान्होत्तर निवृत्त होत आहेत. कलम २५ (७) अन्वये रिक्त जागी नेमणुका करावयाच्या आहेत. निवृत्त होणा-या सदस्यांची नांवे पुढीलप्रमाणे.

**१ .सन्मा.श्री.सुरेश माधवराव मोहिते.**

**२ . सन्मा.श्री.रामदास भाऊसाहेब तांबे**

**३ . सन्मा.श्री.दत्तात्रय विष्णु माने.**

**४ . सन्मा.श्री.प्रकाश शांताराम कदम.**

**५ . सन्मा.सौ.सुजाता विजय घाग.**

**६ . सन्मा.श्री.भरत अभिमन्यु चव्हाण.**

निवृत्त होणा-या सदस्यांची जागी नियम २५ (२) अन्वये यथोचित अर्हताप्राप्त व्यक्तींची नेमणुक करावयाची आहे. तसेच महाराष्ट्र शासनाच्या २७ फेब्रुवारी २००७ रोजीच्या शासन नियमानुसार पक्ष व गटाचे तौलानिक संख्याबळानुसार परिवहन समिती सदस्य पदासाठी नामनिर्देशित केले जातील.

**ठाणे महानगरपालिका ठराव क्रमांक १९२ दिनांक १७.०२.२०१०.**

......

ठ रा व :

महाराष्ट्र शासनाच्या दिनांक १२.१०.२००६च्या शासन निर्णयानुसार पक्ष व गटाच्या तौलानिक संख्याबळानुसार परिवहन समिती सदस्य पदासाठी खालील गटप्रमुखांनी सुचविलेली परिवहन समिती सदस्यांची नांवे नामनिर्देशित केल्याचे मी घोषित करीत आहे.

१. शिवसेना भारतीय जनता पार्टी, बहुजन समाज पार्टी, शिवराज्य पक्ष व अपक्ष या गटाचे गटनेते श्री.राजेंद्र रमेश साप्ते यांनी सुचविलेली नामनिर्देशित सदस्यांची नांवे खालीलप्रमाणे,

**१ . श्री.प्रकाश शांताराम कदम.**

**२ . श्री.काशिराम गोविंद राऊत**

**३ . श्री.शैलेश धनाजी भगत**

**४ . श्री.अजय जयराम जोशी.**

२. लोकशाही आघाडीचे गटनेते श्री.अशोक राजाराम राऊळ यांची सुचविलेली नामनिर्देशित सदस्यांची नावे खालीलप्रमाणे,

**१ . श्री.भरत जगजीवन ठक्कर.**

**२ . श्री.संतोष दत्ताराम पाटील**

ठाणे महानगरपालिकेच्या परिवहन समिती सदस्य पदाकरीता वरील सहा नामनिर्देशित सदस्यांची नांवे परिवहन समिती सदस्य म्हणून घोषणा करण्यांत येत आहे.

सूचक : श्री.पांडुरंग गोविंद पाटील. अनुमोदक : श्री.हणमंत ज्ञानु जगदाळे.

**सर्वानुमते मंजूर.**

महापौर,
ठाणे महानगरपालिका,ठाणे.

मा.आयुक्त सो.यांजकडे माहितीसाठी.

प्रकरण क्रमांक १७४:स्वा.वि.दा.सावरकर तरण तलाव येथील शुल्क दर वाढीनुसार आकारणी करणेस मा.सर्वसाधारण सभेची कार्योत्तर मान्यता मिळणेबाबत.

मा.महासभा ठराव क्रमांक १९९ दिनांक १७.०२.२०१०.

ठ रा व :

कै.मारोतराव शिंदे तरण तलाव व यशवंत रामा साळवी तरण तलाव कळवा येथील शुल्क दरांत वाढ करणेस ठराव क्र.१३८ दि.२५.११.२००९ अन्वये सर्वसाधारण सभेने मान्यता दिलेली असुन मा.आयुक्त सो.यांचे मान्यतेने सदर ठरावाची दि.२५.११.२००९ पासुन अंमलबजावणीय करणेत येत आहे.

ठराव क्र.१८,दि.२३.६.२००९ अन्वये मारोतराव शिंदे तरण तलावास लागू असलेले शुल्क दर स्वा.वि.दा.सावरकर तरण तलावास आकारणेस मा.सर्वसाधारण सभेने दिलेली मान्यता विचारांत घेता स्वा.वि.दा.सावरकर तरण तलाव येथे ठराव क्र.१३८ च्या शुल्क दरवाढीच्या अंमलबजावणीस ही सर्वसाधारण सभा कार्योत्तर मान्यता देत असुन,कोपरीमधील काही नागरीक कै.मारोतराव शिंदे तरण तलाव व कै.यशवंत रामा साळवी तरण तलाव येथील सभासद पद स्विकारलेले आहेत. तरी त्यांना कोपरी तरण तलावामध्ये पोहण्यास अनुमती देण्यांत यावी व त्यांचे सभासदत्व उपरोक्त ठिकाणी वर्ग करण्यांत यावेत या सन्मा.सदस्यांच्या सूचनेसह ही सर्वसाधारण सभा सदरचे प्रस्तावास मान्यता देत आहे.

प्रकरणी इतिवृत्त मंजुरीची वाट न पाहता, प्रशासनाने पुढील आवश्यक ती कार्यवाही करावी असे ही सर्वसाधारण सभा ठरवित आहे.

सर्वानुमते मंजूर.

सूचक : श्री.पांडुरंग पाटील. अनुमोदक : श्री.हणमंत जगदाळे.

सही/-श्री.अशोक बारकु वैती.<br>
महापौर,<br>
ठाणे महानगरपालिका,ठाणे.

**प्रकरण क्रमांक १७५ :** स्लॉटर फी,अनुज्ञप्ती फीमध्ये नविन दराने वाढ करणेस मा.सर्वसाधारण सभेची मान्यता मिळणेबाबत.

......

**ठाणे महानगरपालिका ठराव क्रमांक २०० दिनांक १७.०२.२०१०**

ठ रा व :

पशुवैदयकीय विभागाकडील पूढील ३ वर्षासाठी खालीलप्रमाणे दर निश्चित करण्यास मा.स्थायी समिती ठराव क्र.१४१४ दि.१९.१२.२००९ ची शिफारस विचारांत घेता ही सर्वसाधारण सभा त्यास अंतिम मंजुरी देत आहे.

**नविन दर / सुधारित शुल्क**

| अ. क्र | विषय | सध्याची फी(रु.) | सुधारित फी (रु.) | | |
|---|---|---|---|---|---|
| | | सन | सन | सन | सन |
| | | २००९-१० | २०१०-११ | २०११-१२ | २०१२-१३ |
| १. | एक नग मोठया जनावरांची कत्तल फी बैल,म्हैस,रेडा | ७० | ८० | ९० | १०० |
| २. | एक नग लहान जनावरांची कत्तल फी स्थानिक मेंढया,बक-या | १० | ११ | १२ | १३ |
| ३. | एक नग निर्यातीसाठी मोठया जनावरांस कत्तल फी,बैल,म्हैस,रेडा | २०० | २१० | २२० | २३० |
| ४. | निर्यातीसाठी लहान जनावरांची कत्तल फी मेढया,बक-या एका नगास. | ९० | ९५ | १०० | १०५ |
| ५. | वेंळेव्यतिरिक्त लहान जनावरे मेंढया बक-या एक नग कत्तल फी. | २० | २२ | २४ | २६ |
| ६. | एक नग जादा दिवस मोठया जनावरांची कत्तल फी बैल,म्हैस,रेडा | १०० | ११० | १२० | १३० |

| ७. | अनुज्ञप्ती फी एक वर्षासाठी | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | विषय | सध्याची फी(रु.) | सुधारित फी (रु.) | | |
| | | सन | सन | सन | सन |
| | | २००९-१० | २०१०-११ | २०११-१२ | २०१२-१३ |
| अ. | अधिकृत पशुवधवगृहात मोठी जनावरे बैल,म्हैस,रेडा कापणे खाटीकाचा व्यवसाय | १५०० | १६०० | १७०० | १८०० |
| ब. | अधिकृत पशुवधगृहात लहान जनावरे मेंढया,बक-या कापणे खाटीकाचा व्यवसाय | ६५० | ७०० | ७५० | ८०० |
| क. | महापालिकेच्या हद्दीत खाजगी जागेत मेंढया बक-यांचे मांस विक्री करणे. | ६५० | ७०० | ७५० | ८०० |
| ङ | महापालिकेच्या हद्दीत खाजगी जागेत मोठया जनावरांचे बैल,म्हैस,रेडा मांस विक्री करणे.मेंढया बक-यांचे मांस विक्री करणे.. | १५०० | १६०० | १७०० | १८०० |
| इ. | महापालिकेच्या हद्दीत खाजगी जागेत जिवंत कोंबडी कापून त्यांचे मांस विक्री करणेमोठया जनावरांचे बैल, | ७५० | ८०० | ८५० | ९०० |
| ई. | महापालिकेच्या हद्दीत खाजगी जागेत मांस ळी विक्री करणे.. | ६५० | ७०० | ७५० | ८०० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| फ. | हद्दीत खाजगी जागेत शितपेटीमध्ये मांस व मासळी ठेऊन विक्री करणे.. | १५०० | १६०० | १७०० | १८०० |
| ग. | ठाणे महापालिका जागेत डुकरांचे मांस विक्री करणे.. | १५०० | १६०० | १७०० | १८०० |
| ह. | ठाणे महापालिका हद्दीत शितगृहामध्ये मांस व मासळी विक्री करणे.. | १०५०० | ११००० | ११५०० | १२००० |
| ८. | अनुज्ञप्ती सुरक्षा अनामत | | | | |
| ९. | अनुज्ञप्ती प्रोसेसिंग फी १ वर्षास | ४५० | ५०० | ५५० | ६०० |
| १०. | निर्यातीकरीता जनावरे कापण्याची अनुज्ञप्ती फी १ वर्षास | ६२५० | ६५०० | ६७५० | ७००० |
| ११. | एक नग मोठी जनावरे बैल,म्हैस,रेडा कत्तल फी फक्त बकरीईदकरीता | १०५ | १२० | १३५ | १५० |
| १२. | ठाणे महापालिकेच्या हद्दीबाहेर अधिकृत कत्तलखान्यामध्ये कापलेल्या मोठया व लहान जनावरांचे मांस ठाणे महापालिका हद्दीमध्ये आयात करणेबाबत फी १ वर्षास | १५००० | १७००० | १९००० | २१००० |
| १३. | ठाणे महापालिका हद्दीमध्ये अधिकृत कत्तलखान्यामध्ये कापण्यासाठी मोठी जनावरे बैल,म्हैस,रेडा आयात करणे एक वर्षास फी फक्त अनुज्ञप्तीधारबक मांस विक्री व कापणे या अनुज्ञप्तीधारकासाठी | ५००० | ५५०० | ६००० | ६५०० |
| १४. | ठाणे महानगरपालिका हद्दीमध्ये अधिकृत कत्तलखान्यामध्ये कापण्यासाठी लहान जनावरे शेळया,मेंढया आयात करणे एक वर्षास फी फक्त अनुज्ञप्तीधारक मांस विक्री व कापणे या अनुज्ञप्तीधारकासाठी | ४००० | ४५०० | ५००० | ५५०० |
| १५. | ठाणे महापालिकेच्या हद्दीमध्ये अनधिकृत बांधकाम असलेले दुकानदारांकडून ठरलेल्या दराच्या दीडपट फी त्याचे दुकान सुरु केल्यापासून घेण्यांत यावी. | | | | |

सबब,उपरोक्त विभागाकडील दर निश्चिती सन २०१० ते सन २०१३ पर्यंत लागू करण्यास ही सर्वसाधारण सभा मान्यता देत आहे.

सूचक : श्री.पांडुरंग गोविंद पाटील. अनुमोदक : श्री.हणमंत ज्ञानु जगदाळे.

**सर्वानुमते मंजूर.**

सही/-श्री.अशोक बारकु वैती.
महापौर,
ठाणे महानगरपालिका,ठाणे.

मा.आयुक्त सो.यांजकडे माहितीसाठी.

**प्रकरण क्रमांक १८१ : ठाणे महानगरपालिकेच्या महात्मा फुले भाजी मंडई व गांवदेवी भाजी मंडई येथील बाजार वसुलीचे दर निश्चित करणेस मा.सर्वसाधारण सभेची मान्यता मिळणेबाबत.**

**मा.महासभा ठराव क्रमांक २०१ दिनांक १७.०२.२०१०.**

**ठ रा व :**

**प्रकरणी कार्यालयीन अहवाल पाहता, ठाणे महानगरपालिकेच्या नौपाडा प्रभाग समितीचे कार्यक्षेत्रात महात्मा फुले भाजी मंडई व गांवदेवी भाजी मंडई या दोन मंडया आहेत. महात्मा फुले भाजी मंडईमध्ये एकुण ५३१ गाळेधारक असुन गांवदेवी भाजी मंडई मध्ये एकुण १५४ गाळेधारक असुन त्यांचेकडून संदर्भिय ठरावानुसार खालील नमुद केल्याप्रमाणे बाजार वसुली होत आहे.**

| मंडईचे नांव | डिमांडचे गाळे | फेस व्हॅल्युचे गाळे | | | | एकुण वसुल रुपये |
|---|---|---|---|---|---|---|
| | | पत्राशेड | जमीनीवरील | मच्छी विक्रेते | कोंबडी कापणारे | |
| महात्मा फुले भाजी मंडई | १९२ | १०५ | ९२ | १३५ | ७ | |
| मिळणारे उत्पन्न | रु.२२०२६२/- | रु.२१४ प्रतिदिन X ३६५ दिवस = रु.७८११० | | | | २९८३७२/- |
| गांवदेवी भाजी मंडई | -- | १५४ | -- | -- | -- | |
| मिळणारे उत्पन्न | | रु.१३६ प्रतिदिन X ३६५ दिवस = रु.४९६४० | | | | ४९६४०/- |
| एकुण उत्पन्न | रु.२२०२६२/- | रु.३५० प्रतिदिन X ३६५ दिवस = रु.१२७७५०/- | | | | ३४८०१२/- |

**दोन्ही भाजी मंडईतील गाळेधारकांची संख्या विचारांत घेता सर्व गाळेधारकांकडून वसुली होते असे गृहीत धरले तरी प्रचलित दराने म्हणजे ०.५० पैसे या दराने खालील नमूद केल्याप्रमाणे जास्तीतजास्त वार्षिक वसुली होऊ शकेल.**

**एकुण डिमांडचे गाळे १९२ वसुली रु.२२०२६२/-**

**एकुण फेस व्हॅल्युचे गाळे ( महात्मा फुले मंडई ३३९ + गांवदेवी भाजी मंडई १५४)=४९३ गाळे. वसुली रु.१७९९४५/- एकुण वार्षिक वसुली रक्कम रु.४,००,२०७(अक्षरी रुपये चार लक्ष दोनशे सात मात्र) इतकी होऊ शकेल.**

**बाजार फी चे दर निश्चित करणेकामी मा.महासभा ठराव क्र.२२१ हा दि.२०.११.१९८६ पारित झालेला असुन सदर ठरावानुसार १ चौ.मी. करीता ०.५० पैसे या दराने आजपावेतो बाजारवसुली होत आहे. महात्मा फुले भाजी मंडईतील १९२ गाळे हे पक्के असुन शटर असलेले त्यांनासुध्दा ०.५० पैसे या दराने व भाजी विक्रेते/मच्छी विक्रेते/कोंबडी कापणारे यांना सुध्दा ०.५० पैसे या दरानेच बाजार वसुली होत आहे. या गाळेधारकांचे वसुलीमध्ये फरक एवढाच आहे की,१९२ गाळेधारकांची बाजार विभागाकडील आकारणी नोंदवहीत (असेसमेंट रजिस्टर) नोंद असुन त्यांचे वापरात असलेल्या जागेस प्रति चौ.मी.करीता ०.५० पैसे या दराने आकारणी केलेली असुन त्यांची वसुली वार्षिक होते. इतर ३३९ गाळेधारकांची वसुली ही प्रति चौ.मी.करीता ०.५० याच दराने परंतू दैनंदिन फेस व्हॅल्यु होते. महात्मा फुले भाजी मंडईचे नविन वास्तुचे बांधकाम अर्धवट स्थितीत असल्याने भाजी मंडईचे आवारातील बरेच भाजी विक्रेते हे आजूबाजुच्या रस्त्यांचे कडेला भाजी विक्री करीत असल्याने सध्यस्थितीत तेथे मच्छी विक्रेत्यांसह फक्त २१४ विक्रेत्यांकडूनच बाजार वसुली होते.**

गांवदेवी भाजी मंडईमध्ये एकुण १५४ गाळेधारक आहेत. सदर मंडईचे नविन वास्तुचे बांधकाम सुध्दा अर्धवट स्थितीत असल्याने तेथील गाळेधारकांना गांवदेवी मैदानात पर्यायी जागा दिलेली आहे. परंतू तेथे व्यवसाय होत नसल्याचे कारण पूढे करुन तेथील भाजी विक्रेत्यांना महर्षी कर्वे रोडच्या दुतर्फा भाजी विक्रीचे स्टॉल्स तयार करुन ते व्यवसाय करीत आहेत. त्यामुळे तेथेही फक्त १३६ गाळेधारकांकडूनच बाजार वसुली होते. सदर वसुली सुध्दा ०.५० पैसे याच दराने दैनंदिन फेस व्हॅल्यु करण्यांत येते.

महात्मा फुले भाजी मंडई व गांवदेवी भाजी मंडई या दोन्ही मंडयांच्या वास्तु ठाणे महानगरपार्लिकेच्या मालकीच्या आहेत. त्यामधील गाळेधारकांना महानगरपालिकेमार्फत वास्तु,सुरक्षा,पाणी पुरवठा ,विदुयत पुरवठा, स्वच्छता या सुविधा पुरविण्यांत येत असुन याकामी खालील नमूद केल्याप्रमाणे ठाणे महानगरपालिकेस अंदाजे खर्च करावा लागत आहे.

| महापालिकेच्या सुविधा | होत असलेला /होणारा अंदाजे वार्षिक खर्च<br>महात्मा फुले भाजी मंडई गांवदेवी भाजी मंडई | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| बांधकाम | रु.७,९१,४७,०३०/- रु.३,५५,००,०००/- | प/२५३ |
| निगा व देखभाल | रु.२०,००,०००/- रु.२५,००,०००/- | |
| सुरक्षा | रु.५,८८,०००/-+भत्ते रु. ५,८८,०००/-+भत्ते | प/२६१ |
| पाणी पुरवठा | रु.२९,४४८/- रु.३३,२१६/- | प/२६३ |
| विदुयत पुरवठा | रु.१,६८,०००/- रु.१,३२,०००/- | प/२६७ |
| स्वच्छता | रु.२५,७१,२०४/-+भत्ते रु.१५,००,०००/-+भत्ते | प/२६९ |
| आस्थापना | रु.९,००,०००/-+भत्ते एकत्रित | प/२७३ |
| एकुण वार्षिक अंदाजे खर्च | रु.८५४०३६८२/-+भत्ते रु.४०२५३२१६/-+भत्ते | |

दोन्ही मंडया मिळून होणारा एकुण अंदाजे खर्च रक्कम रुपये १२,५६,५६,८९८/-(अक्षरी रक्कम रुपये बारा कोटी छपन्न लक्ष छपन्न हजार आठशे अठठयाणव मात्र)

सदर दोन्ही मंडया मिळून सध्यस्थितीत रक्कम रुपये ३,४८,०१२/-(अक्षरी रुपये तीन लक्ष अट्ठेचाळीस हजार बारा मात्र) इतके उत्पन्न मिळत आहे. प्रचलित दरानुसार सदर गाळेधारकांकडून वसुली झाल्यास हे उत्पन्न जास्तीतजास्त रक्कम रुपये ४,००,२०७ अक्षरी रुपये चार लक्ष दोनशे सात मात्र इतकेच उत्पन्न प्रचलित दरानुसार मिळू शकेल. याकरीता ठाणे महानगरपालिकेचा झालेला व होणारा खर्च अंदाजे रक्कम रुपये १२,५६,५६,८९८/-(अक्षरी रक्कम रुपये बारा कोटी छपन्न लक्ष छपन्न हजार आठशे अठठयाणव मात्र)इतका आहे. महानगरलिकेस मिळणारे उत्पन्न व होणारा खर्च यामध्ये फार मोठया प्रमाणात तफावत आहे. सध्यस्थितीत हे उत्पन्न खर्चाच्या ०.२८टक्के इतके मिळते.

अतिक्रमण विभागाकडील फी व इतर आकाराचे दर निश्चितीबाबत मा.महासभेने ठराव क्र.१५४/५ दि.३१.७.२००७ पारित केला असुन सदर ठरावान्वये खालीलप्रमाणे दर निश्चित केले आहेत.( पृष्ठ क्र.प/२२३)

| तातपुरती जागा पावती वसुली | प्रतिदिन आकार रुपये |
|---|---|
| हातगाडी,पावभाजी,भेळपुरी,खादयपदार्थ विक्री | ३०/- |
| हातगाडी,भाज्या,फळे व इतर | २०/- |
| १.चौ.मी.जागा-नाशवंत वस्तु विक्रीसाठी | १५/- |
| १ चौ.मी.जागा टिकावू वस्तु विक्रीसाठी | २०/- |
| टोपली,पाटीवरील व्यवसाय करणा-यांकडून | १०/- |

फेरीने व्यवसाय करणा-यांकडून वरीलप्रमाणे विहित केलेल्या दराने वसुली करण्यांत येते. शिवाय अतिक्रमण विभागाचे कारवाईव्दारे त्यांचा माल जप्त करण्यांत येतो व दंड आकारुन तो सोडण्यांत येतो. म्हणजेच हे फेरीवाले रोजची वसुली देऊनही अनेकदा दंडही भरतात.

महानगरपालिकेच्या वरील दोन्ही मंडयांमध्ये व्यवसाय करणेसाठी गाळेधारकांना विशिष्ट जागा महानगरपालिकेने उपलब्ध करुन दिलेली आहे. तसेच त्यांना अनेक सुविधाही महानगरपालिका देते शिवाय त्यांना कोणत्याही प्रकारच्या कारवाईस सामोरे जावे लागत नसल्याने त्यांच्या मालाचे नुकसान होत नाही. त्यांचा व्यवसाय बंद रहात नाही व त्यांना कोणत्याही प्रकारचा दंडही भरावा लागत नाही. असे असताना त्यांच्याकडून दैनंदिन वसुली मात्र मा.महासभा ठराव क्रा.२२१,दि.२०.११.१९८६ अन्वये प्रति चौ.मी.ला ०.५० पैसे या दरानेच केली जात आहे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७९ खंड (ड)अन्वये महानगरपालिकेच्या मालकीची कोणतीही स्थावर मालमत्ता मोबदला घेऊन पट्टयाने देता येईल, परंतू असा मोबदला चालू बाजार किंमतीपेक्षा कमी असता कामा नये, अशी तरतुद आहे. सहाय्यक संचालक नगररचना यांनी शासनाच्या मुल्य दर विभागाने विहित केल्याप्रमाणे जागेचे दर दिलेले आहेत. त्यांच्या अहवालानुसार रक्कम रुपये १८९००/- प्रति चौरस मीटर/प्रति वर्ष इतके जागेचे दर असल्याचे नमूद केले आहे. म्हणजेच रुपये ५१.७८ इतका दर प्रति चौरस मीटर/ प्रति दिन आहे. या दराचा विचार करता.महात्मा फुले भाजी मंडई व गांवदेवी भाजी मंडई मधील गाळेधारकांकडून प्रति चौ.मी.करीता रु.५२/-प्रतिदिन वसुली करणेचे प्रस्तावित करण्यांत येत आहे. प्रति चौ.मी.करीता रु.५२/-प्रतिदिन वसुल केल्यास खालील नमूद केल्याप्रमाणे महानगरपालिकेस उत्पन्न मिळू शकेल.

अ)महात्मा फुले भाजी मंडई -एकुण गाळे =५३१ (डिमांडचे १९२+फेस व्हॅल्युचे ३३९)

डिमांडचे गाळे - अ. किराणा व इतर = १६८ वापरातील जागा = ११८०.३१ चौ.मी.

ब. मटण विक्री = २४ वापरातील जागा = ६०.२२४ चौ.मी.

--------------------

वापरातील एकुण जागा १२४०.५५ चौ.मी.

प्रस्तावित दर रु.५२/-प्रतिदिन/प्रति चौ.मी X ५२/-रु.

--------------------

६४५०९/-प्रतिदिन वसुली

X ३६५ दिवस

--------------------

(१) २,३५,४५,७८५/-वार्षिक वसुली.

फेस व्हॅल्युचे गाळे = ३३९ ३३९ गाळे

प्रस्तावित दर रु.५२/-प्रतिदिन /प्रति चौ.मी. X ५२ रु.

---------------------

१७६२८/-प्रतिदिन वसुली

X ३६५ दिवस

----------------------

(२) ६४,३४,२२०/-वार्षिक वसुली

(१)+(२)= २९९,८०,००५/-एकुण अपेक्षित उत्पन्न.

ब)गांवदेवी भाजी मंडई - एकुण गाळे १५४ सर्व फेस व्हॅल्युचे

फेस व्हॅल्युचे गाळे - १५४ १५४ गाळे

प्रस्तावित दर रु.५२/- प्रतिदिन/प्रति चौ.मी X ५२/-रु.

---------------------

८००८ /- प्रतिदिन वसुली

X ३६५ दिवस

---------------------

२९,२२,९२०/-वार्षिक वसुली.

| | |
|---|---|
| महात्मा फुले भाजी मंडई अपेक्षित वार्षिक उत्पन्न रु. | २,९९,८०,००५/- |
| गांवदेवी भाजी मंडई अपेक्षित वार्षिक उत्पन्न रु. | २९,२२,९२०/- |
| | -------------------- |
| एकुण अपेक्षित वार्षिक उत्पन्न रुपये | ३,२९,०२,९२५/- |
| | --------------------- |

वरील वस्तुस्थितीचा विचारविनिमय करुन चर्चा करता, महात्मा फुले भाजी मंडई व गांवदेवी भाजी मंडई मधील गाळेधारकांकडून प्रति चौरस मीटरकरीता रु.२५/- प्रतिदिन वसुल करणेस ही सर्वसाधारण सभा मान्यता देत आहे.

प्रशासनाचे सदर प्रस्तावातील तांत्रिक व कायदेशीर बाबी तपासल्या असुन त्या योग्य आणि कायदेशीर आहेत असे गृहीत धरुन ही सर्वसाधारण सभा या प्रस्तावास मंजुरी देत आहे. इतिवृत्त मंजुरीची वाट न पाहता प्रशासनाने पूढील कार्यवाही करावी असे ही सर्वसाधारण सभा ठरवित आहे.

सर्वानुमते मंजूर.

सूचक : श्री.पांडुरंग पाटील. अनुमोदक : श्री.हणमंत जगदाळे.

सही/-श्री.अशोक बारकु वैती.
महापौर,
ठाणे महानगरपालिका,ठाणे.

प्रकरण क्रमांक १९८: ठाणे महानगरपालिकेमार्फत विविध सेवा संस्थांना डक्ट/केबलसाठी आकारण्यात येणा-या रस्ता फोड फी दरांत सुधारणा करणेबाबत मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेसाठी सादर.

मा.महासभा ठराव क्रमांक २०५ दिनांक १७.०२.२०१०.

ठ रा व :

प्रकरण कागदपत्र व कार्यालयीन अहवाल पाहता,ठाणे महानगरपालिका हद्दीतील रस्त्यावर विविध सेवा संस्था महानगर टेलिफोन निगम, महाराष्ट्र राज्य विदयुत मंडळ,पाणी पुरवठा व मल:निस्सारण विभाग,महानगर गॅस लि. तसेच केबल संस्था यांचेकडून रस्ते खोदाई करण्यांत येत असते. सदर खोदलेले चर ठामपास खडीकरण व डांबरीकरण पध्दतीने बुजविणे आवश्यक आहे. त्याकरीता सदर संस्थांकडून पुनर्पृष्ठीकरण फी खालीलप्रमाणे वसुल केली जाते.

| अ.क्र | रस्त्याचे नांव | ठामपा ठराव क्र.१७५दि.२०.०९.०६ नुसार |
|---|---|---|
| १. | डांबरी रस्ता/पेव्हर ब्लॉक | रु.२०००/-प्रति चौ.मी. |
| २. | ग्राऊंटींग केलेला रस्ता | रु.८००/-प्रति चौ.मी. |
| ३. | कच्चा रस्ता | रु.२००/-प्रति चौ.मी. |
| ४. | फुटपाथ | रु.१२००/-प्रति चौ.मी. |
| ५. | फुटपाथ | रु.८००/-प्रति चौ.मी. |
| ६. | डक्ट क्रॉसिंग | रु.२०००/-प्रति चौ.मी. |
| ७. | जमिनीतून ड्रीलींग करणे | रु.२००/-प्रति चौ.मी. |

त्याचप्रमाणे विनापरवानगी खोदाईबाबत दंडात्मक शुल्क खालील दराने वसुल केले जाते.

| अ.क्र. | विषय | दंडाचे स्वरुप |
|---|---|---|
| १. | परवानगी पत्र दिले आहे/पुनर्पृष्टीकरण फीचा भरणा केला आहे/परंतू विना परवानगी रस्ते खोदाई केल्याबाबत | पुनर्पृष्टीकरण फी च्या ५%दंडात्मक रक्कम |
| २. | परवानगी पत्र दिले आहे/ पुनर्पृष्टीकरण फी चा भरणा केला नाही/परंतू विना परवानगी रस्ते खोदाई केल्याबाबत . | पुनर्पृष्टीकरण फी+ पुनर्पृष्टीकरण फी च्या २५% दंडात्मक रक्कम. |
| ३. | परवानगी पत्र दिले आहे/ पुनर्पृष्टीकरण फी चा भरणा केला नाही/परंतू विना परवानगी रस्ते खोदाई केल्याबाबत . | पुनर्पृष्टीकरण फी+ पुनर्पृष्टीकरण फी च्या ५०% दंडात्मक रक्कम. |

परंतू ठामपाचे सध्याची रस्ताफोड फी दरांत सन २००६ नंतर कोणताही बदल केलेला नाही. सदरचे दर हे बाजारभावानुसार अत्यंत कमी आहेत. त्यामुळे मुंबई महानगरपालिकेच्या दरानुसार त्यात सुधारणा केल्यास महापालिकेला महासुलात वाढ होऊ शकते. तसेच रस्ता फोड फी व त्यासाठी पुनर्पृष्टीकरणासाठी महापालिकेस येणारा खर्च याचा ताळमेळ जमू शकतो. मुंबई महानगरपालिकेच्या सध्याच्या दर पत्रकाच्या अनुषंगाने प्रशाासनामार्फत खालीलप्रमाणे दर आकारणेबाबत शिफारस केलेली आहे.

अ. पदपथासाठी :

| अ. क्र. | अस्तित्वातील पृष्ठभाग | पुनर्पृष्ठीकरण पृष्ठभाग | आकारण्याचा दर प्रति.चौ.मी. |
|---|---|---|---|
| १. | पेव्हर ब्लॉक वगळता इतर पृष्ठभाग | पेव्हर ब्लॉक | १८४९.०० |
| २. | पेव्हर ब्लॉक वगळता इतर पृष्ठभाग | लॅकर कोटेड पेव्हर ब्लॉक | २०१५.०० |
| ३. | पेव्हर ब्लॉक | पेव्हर ब्लॉक | १५५४.०० |
| ४. | लॅकर कोटेड पेव्हर ब्लॉक | लॅक्र कोटेड पेव्हर ब्लॉक | १६१८.०० |

ब. रस्त्यासाठी :

| अ. क्र. | अस्तित्वातील पृष्ठभाग | पुनर्पृष्ठीकरण पृष्ठभाग | आकारण्याचा दर प्रति.चौ.मी. |
|---|---|---|---|
| १. | मास्टिक अस्फाल्ट | मास्टिक अस्फाल्ट | ६०७८.०० |
| २. | डांबरी ( ६०/७० ग्रेड ) | डांबरी ( ६०/७० ग्रेड ) | ४५५३.०० |
| ३. | डांबरी ( ३०/४० ग्रेड ) | डांबरी ( ३०/४० ग्रेड ) | ४६३१.०० |
| ४. | पेव्हर ब्लॉक ( ८० मी.मी.) | पेव्हर ब्लॉक ( ८० मी.मी.) | ३७००.०० |
| ५. | पेव्हर ब्लॉक ( १०० मी.मी.) | पेव्हर ब्लॉक ( १०० मी.मी.) | ३७७३.०० |

क. अस्तित्वातील डक्ट वापरणेकरीता :

अस्तित्वातील डक्ट वापरणेकरीता रु.२३१० प्रति मी./प्रति केबल आकारणी करणे.

ङ दुप्पट दराने आकारणी :

ज्याठिकाणी रस्त्याचे किंवा पदपथाचे काम झालेनंतर सहा महिन्याच्या आंत डक्ट/केबल टाकणेसाठी परवानगी देताना वरीलप्रमाणे दराच्या दुप्पट दराने आकारणी करणे.

इ. जास्त क्षेत्रफळाच्या डक्ट / केबलसाठीचे दर :

सध्यस्थितीत एका परवानगीमध्ये विविध संस्था त्याच ठिकाणी एकापेक्षा जास्त डक्ट/केबल टाकतात त्यमुळे ६"( सहा इंच) व्यासा (क्षेत्रफळ १८२.३२ चौ.सेमी.) पर्यंत वरील दराप्रमाणे आकारणी करणे,त्यापेक्षा जास्त क्षेत्रफळाच्या डक्ट/केबल टाकावयाच्या असतील तर वाढीव क्षेत्रफळाच्या प्रमाणात जादा रस्ता फोड फी आकारणी करणे.

ई . दंडात्मक आकारणी :

| अ.क्र. | दंडाबाबतचे स्वरुप | दंडाची रक्कम |
|---|---|---|
| १. | पुनर्पृष्ठीकरण फी चा भरणा केला नाही/ परवानगी पत्र दिले नाही/परंतू विना परवानगी रस्ते खोदाई केली आहे. | पुनर्पृष्टीकरण फी+ पुनर्पृष्टीकरण फी च्या ५०% दंडात्मक रक्कम. |
| २. | पुनर्पृष्ठीकरण फी चा भरणा केला नाही/ परवानगी पत्र दिले नाही/परंतू विना परवानगी रस्ते खोदाई केली आहे. | पुनर्पृष्टीकरण फी च्या २५% दंडात्मक रक्कम. |
| ३. | पुनर्पृष्ठीकरण फी चा भरणा केला नाही/ परवानगी पत्र दिले नाही/परंतू विना परवानगी रस्ते खोदाई केली आहे. | मुदत संपल्यानंतर रु.१०००/- प्रति दिन. |
| ४. | डक्ट केबल टाकण्याचे काम झाले आहे. परंतू अतिरिक्त माती उचलण्यांत आलेली नाही. | .प्रति ट्रक/डंपर फे-यास रु.२०००/-प्रमाणे दंड आकारणी. |

फ. भुईभाडे ( रस्ता वापर फी )आकारणी :

सध्यस्थितीत विविध सेवा संस्था जे केबल /डक्ट टाकतात त्याबाबत भुईभाडे आकारले जात नाही. त्यामुळे सदर संस्थांना रु.५/-प्रतिवर्ष/प्रति मीटर याप्रमाणे पुढील २० वर्षाचा विचार केल्यास रक्कम रु.५/-X२० वर्ष =रु.१००/- प्रति मी.एक रकमी भुईभाडे (रस्ता वापर फी) आकारणी करणे.

सबब वरीलप्रमाणे प्रशासनाने केलेल्या शिफारशीनुसार सुधारित दर आकारण्यास ही महासभा मान्यता देत आहे.

प्रकरणी इतिवृत्त मंजुरीची वाट न पाहता, प्रशासनाने पुढील आवश्यक ती कार्यवाही करावी असे ही सर्वसाधारण सभा ठरवित आहे.

सर्वानुमते मंजूर.

सूचक : श्री.पांडुरंग पाटील. अनुमोदक : श्री.हणमंत जगदाळे.

सही/-श्री.अशोक बारकु वैती.
महापौर,
ठाणे महानगरपालिका,ठाणे.

**प्रकरण क्रमांक २१४ :- छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयाच्या रक्तपेढी विभागासाठी"रक्त घटक विघटन" (Blood Component Separate Unit) उपकरणे खरेदी करण्यास मा.सर्वसाधारण सभेची मान्यता मिळणेबाबत.**

**ठाणे महानगरपालिका ठराव क्रमांक १९४ दिनांक १७/०२/२०१०**

**ठ रा व :-**

प्रकरणी कागदपत्र व त्यावरील कार्यालयीन अहवाल पाहता, छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयाच्या रक्त पेढीत रक्त संक्रमण सुविधा उपलब्ध असून त्यात वार्षिक २५०० यूनिट रक्त जमा व संक्रमीत केले जाते. रक्त संक्रमणाच्या आधुनिकीकरणामुळे तंत्रज्ञानात आलेल्या मुलभूत सुधारणांमुळे सदर रक्तास ३ ते ४ घटकांमध्ये विघटीत करुन प्रत्येक घटक वेगवेगळया रुग्णांस दिला जाऊ शकतो. यामुळे एक रक्त बाटलीने ३ ते ४ रुग्णांचे जीव वाचवले जाऊ शकतात. सदर बाबीच्या अंमलबजावणीबाबत राज्य रक्त संक्रमण सोसायटीकडून पत्र पाठविण्यात आलेले आहे व अन्न व औषध प्रशासनाकडून नवीन रक्तपेढीस अनुज्ञापन देण्यासाठी सदर बाबीची सक्ती केली जात आहे.

प्रकरणी तयार होणारे रक्तघटक खालीलप्रमाणे आहेत :-

| क्र. | रक्तघटक |
|---|---|
| १ | **Packed Red Blood Corpuscles** |
| २ | **Fresh Frozen Plasma** |
| ३ | **Platelets** |
| ४ | **Cryoprecipitate** |

छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयाच्या विविध विभागात दाखल होणा-या रुग्णांच्या प्रभावी उपचारासाठी सदर रक्त घटक अत्यंत गरजेचे असून आजमितीला हे घटक लागणा-या रुग्णांना सदर रक्त घटक खाजगी रक्तपेढयांमधून विकत घ्यावे लागत आहेत अथवा त्यासाठी सदर रुग्णांना मुंबईच्या रुग्णालयात संदर्भित करावे लागत आहे.

सदर युनिट छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयात सुरु करण्यासाठी पर्याप्त जागा असून तयासाठी लागणारे अधिकांश अनिवार्य मनुष्यबळ कार्यरत आहे.

प्रकरणी छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयाच्या रक्तपेढीने सदर यूनिटची मागणी केली असून त्यासाठी खालील उपकरणे विकत घेणे गरजेचे आहे. सदर उपकरणांची मागणी छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयाच्या रक्तपेढी विभागाने केली आहे. सदर उपकरणे, त्यांची गरज तसेच सर्व कर गृहित धरता व ५ वर्षांची ए.एम.सी. धरता अंदाजे किंमत खालीलप्रमाणे आहेः-

..२/-

| Sr.No. | Equipments | Required | Cost Per Unit | Approximate Cost |
|---|---|---|---|---|
| १ | Refrigerated Centrifuge | १ | ३८५००० | ३८५००० |
| २ | Laminar Flow Cabinet | १ | १००००० | १००००० |
| ३ | Tube Sealer Table Top Model CE mark | १ | १५०००० | १५०००० |
| ४ | Tube Sealer Portable | १ | १८५००० | १८५००० |
| ५ | Plasma Expressor Electronic/manual | २ | ६५००० | १३०००० |
| ६ | Blood Collection Monitor ॐCE Mark | २ | १५०००० | ३००००० |
| ७ | Optipress | १ | ३२००००० | ३२००००० |
| ८ | Donor Station | २ | १८०००० | ३६०००० |
| ९ | Semiautomatic Cell Counter | १ | ६३५००० | ६३५००० |
| १० | Deep Freezer-८० C | १ | ४५०००० | ४५०००० |
| ११ | Deep Freezer-४० C | १ | ५४५००० | ५४५००० |
| १२ | Compo Scale | १ | ४०००० | ४०००० |
| १३ | Platelet Agitator With Incubator-४८ Bags | २ | ३७५००० | ७५०००० |
| १४ | Cryobath | १ | १९०००० | १९०००० |
| १५ | pH Meter | १ | १२८०० | १२८०० |

तरी सदर उपकरणे खरेदी करणेसाठी तसेच सदर उपकरणासाठी येणारा खर्च वित्तीय वर्ष २००९-१० मधील "रुग्णालय उपकरणे खरेदी संकेतांक क्र.२९००/६२१/४१९०१६" मधील मंजूर तरतुदीतून करणेस ही महासभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.

इतिवृत्त मंजुरीची वाट न पाहता प्रशासनाने पुढील कार्यवाही करावी.

सुचक :- श्री. पांडूरंग पाटील — अनुमोदक :- श्री.हणमंत जगदाळे

सर्वानुमते मंजूर

**सही/- अशोक बारकू वैती**
**महापौर,**
**ठाणे महानगरपालिका, ठाणे.**

**प्रकरण क्रमांक २१५ :- ठाणे महानगरपालिकेचे सर्व दवाखाने,रुग्णालय याठिकाणी असलेल्या प्रयोगशाळांना बायोकेमिस्ट्री ॲनालायझर ॲण्ड सेल काउंटर पुरवठा करणेस मा.सर्वसाधारण सभेची मान्यता मिळणेबाबत.**

**ठाणे महानगरपालिका ठराव क्रमांक १९५ दिनांक १७/०२/२०१०**

**ठ रा व :-**

प्रकरणी कागदपत्र व त्यावरील कार्यालयीन अहवाल पाहता, ठाणे महानगरपालिकेच्या आरोग्य विभागामार्फत वैद्यक, चिकित्सकीय, शल्यचिकित्सा, अस्थिव्यंग शास्त्र, माता बाल संगोपन सेवा व इतर सेवा २५ नागरी आरोग्य केंद्र, ५ माता बाल संगोपन केंद्र, २ रुग्णालये व १ वैद्यकीय महाविद्यालयामार्फत पुरविल्या जातात.

यामध्ये बाहयरुग्ण सेवा, आंतररुग्ण सेवा, रोगप्रतिबंधात्मक व साथरोग नियंत्रण सेवा, सार्वत्रिक लसीकरण व इतर राष्ट्रीय कार्यक्रम राबविले जातात तसेच रक्त, लघवी, स्पूटम तपासणी, पाणी नमूने तपासणी तसेच इतर विकृतीशास्त्र संबंधित चाचण्या केल्या जातात.

उपरोक्त तपासण्या तसेच इतर तपासण्या या रोगनिदान तसेच उपचार व चिकित्सकीय सेवांचे स्तर उंचावण्यासाठी तसेच सदर सर्व सुविधा महानगरपालिकेच्या खालील ८ नागरी आरोग्य केंद्रातील प्रयोगशाळांमध्ये उपलब्ध करुन देण्यासाठी अत्यंत गरजेचे आहे. जेणेकरुन ठाणे महानगरपालिकेच्या जनतेला दैंनदिन रोग उपचारासाठी लागणा-या प्रयोगशाळेच्या सुविधा त्यांच्या निवासाजवळ उपलब्ध होतील.

सदर उपकरणे निमस्वयंचलित असल्याकारणाने त्यातून अचूक निकाल देणे सहज शकय होते तसेच महानगरपालिकेची वाढती जनसंख्या व त्याअन्वये आरोग्य सुविधांवर पडणार भार लक्षात घेता सदर ठिकाणी अधिकाधिक चाचण्या होणे अपेक्षित आहे. याकरीता असलेल्या कर्मचारी वर्गात सदर कामे सक्षमपणे करणेसाठी निमस्वयंचलित उपकरणे असणे अनिवार्य आहे.

प्रकरणी ठाणे महानगरपालिकेच्या असलेल्या ९ प्रयोगशाळा खालिलप्रमाणे आहेत :-

| अ.क्र | आरोग्य केंद्र | बायोकेमिस्ट्री ॲनालायझर | सेल काउंटर |
|---|---|---|---|
| १ | काजुवाडी आरोग्य केंद्र | १ | १ |
| २ | मानपाडा आरोग्य केंद्र | १ | १ |
| ३ | मुंब्रा आरोग्य केंद्र | १ | १ |
| ४ | नौपाडा आरोग्य केंद्र | १ | १ |
| ५ | कोरस रुग्णालय | १ | १ |
| ६ | बाळकुम आरोग्य केंद्र | १ | १ |
| ७ | वर्तकनगर आरोग्य केंद्र | १ | १ |
| ८ | शिवाजीनगर आरोग्य केंद्र | १ | १ |
| ९ | कोपरी आरोग्य केंद्र | १ | १ |

सदर एका बायोकेमिस्ट्री ॲनालायझर उपकरणाची सर्व कर गृहित धरता व ५ वर्षांची ए.एम.सी. धरता अंदाजे किंमत रु.२,५०,०००/- इतकी आहे. प्रकरणी ९ उपकरणांची अंदाजे किंमत रु. २२,५०,०००/- इतकी आहे. तसेच सदर एका सेल काउंटर उपकरणाची सर्व कर गृहित धरता व ५ वर्षांची ए.एम.सी. धरता अंदाजे किंमत रु.६,००,०००/- इतकी आहे. प्रकरणी ९ उपकरणांची अंदाजे किंमत रु.५४,००,०००/- इतकी आहे.

तरी सदर उपकरणे खरेदी करणेसाठी तसेच सदर उपकरणासाठी येणारा खर्च वित्तीय वर्ष २००९-१० मधील "रुग्णालय उपकरणे खरेदी संकेतांक क्र.२९००/६२१/४१९०१६" मधील मंजूर तरतुदीतून करणेस ही महासभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.

इतिवृत्त मंजुरीची वाट न पाहता प्रशासनाने पुढील कार्यवाही करावी.

सुचक :- श्री. पांडूरंग पाटील | अनुमोदक :- श्री.हणमंत जगदाळे

<u>सर्वानुमते मंजूर</u>

**सही/- अशोक बारकू वैती**
**महापौर,**
**ठाणे महानगरपालिका, ठाणे.**

**प्रकरण क्रमांक २१६ :- ठाणे महापालिकेचे सर्व दवाखाने व रुग्णालयांसाठी पाणी पिण्याची सुविधा उपलब्ध होण्यासाठी वॉटर कुलर खरेदी करण्यास मा.सर्वसाधारण सभेची कार्योत्तर मान्यता मिळणेबाबत.**

**ठाणे महानगरपालिका ठराव क्रमांक १९६ दिनांक १७/०२/२०१०**

**ठ रा व :-**

प्रकरणी कागदपत्र व त्यावरील कार्यालयीन अहवाल पाहता, ठाणे महानगरपालिकेच्या आरोग्य विभागामार्फत वैद्यक, चिकित्सकीय, शल्यचिकित्सा, अस्थिव्यंग शास्त्र, माता बाल संगोपन सेवा व इतर सेवा २५ नागरी आरोग्य केंद्र, ५ माता बाल संगोपन केंद्र, २ रुग्णालये व १ वैद्यकीय महाविद्यालयामार्फत पुरविल्या जातात.

सदर ठिकाणी प्रत्येक नागरी आरोग्य केंद्र तथा माताबाल संगोपन केंद्रात कोणत्याही वेळी २०-३० कर्मचारी व २०-३० रुग्ण व त्यांचे नातेवाईक सरासरी असतात. तसेच रुग्णालयात कोणत्याही वेळी २०-३० कर्मचारी व ५०-७५ रुग्ण व त्यांचे नातेवाईक उपस्थित असतात.

सदर आस्थापनांमध्ये उपरोक्त लोकांना थंड निर्जंतुक पाणी उपलब्ध होण्याची पुरेशी सुविधा सद्यस्थितीत नाही. प्रकरणी सर्व नागरी आरोग्य केंद्र व माताबाल संगोपन रुग्णालयांना ८० लिटर साठा क्षमतेने व ४० लिटर प्रति तास पाणी थंड करण्याची क्षमता असणारे संपूर्ण स्टेनलेस स्टील ढाचा असलेले वॉटर कुलर देणे संयुक्तिक राहिल. सद्यस्थितीत ४ ठिकाणी नागरी आरोग्य केंद्र एकाच इमारतीत स्थित आहेत. सदर ठिकाणी प्रत्येक इमारतीत एकच कुलर देणे संयुक्तिक राहिल.

राजीव गांधी वैद्यकीय महाविद्यालयात एकूण १०० प्राध्यापक, २०० कर्मचारी, ३०० विद्यार्थी व १६० रेसिडंट आहेत. सदर ठिकाणी मुलांचे व मुलींचे वसतिगृह, वाचनालय व मुख्य इमारतीत थंड व निर्जंतुक पाणी उपलब्ध होण्याची पुरेशी सुविधा सद्यस्थितीत नाही. सदर ठिकाणी ८० लिटरसाठी क्षमतेचे व ४० लिटर प्रति तास पाणी थंड करण्याची क्षमता असणारे संपूर्ण स्टेनलेस स्टील ढाचा असलेले २ वॉटर कुलर देणे तसेच १५० लिटर साठा क्षमतेचे व १५० लिटर प्रति तास पाणी थंड करण्याची क्षमता असणारे संपूर्ण स्टेनलेस स्टील ढाचा असलेले २ वॉटर कुलर देणे संयुक्तिक राहील.

प्रकरणी ८० लिटर साठा क्षमतेचे व ४० लिटर प्रति तास पाणी थंड करण्याची क्षमता असणारे संपूर्ण स्टेनलेस स्टील ढाचा असलेले २५ वॉटर कुलर व १५० लिटर साठा असलेले स्टील ढाचा असलेले २ वॉटर कुलर गरजेचे आहेत. सदर कुलरचा तक्ता सोबत जोडलेला आहे.

प्रकरणी ८० लिटर साठा क्षमतेचे व ४० लिटर प्रति तास पाणी थंड करण्याची क्षमता असणारे संपूर्ण स्टेनलेस स्टील ढाचा असलेल्या वॉटर कुलरची अंदाजे किंमत रु.३५,०००/- प्रति नग व १५० लिटर साठा क्षमतेचे व १५० लिटर प्रति तास पाणी थंड करण्याची क्षमता असणारे संपूर्ण स्टेनलेस स्टील ढाचा असलेले वॉटर कुलरची अंदाजे किंमत रु.५५,०००/- प्रति नग आहे. सदर सर्व कुलरची एकूण खर्च रु.९,८५,०००/- अपेक्षित आहे.

..२/-

तरी सदर उपकरणे खरेदी करणेसाठी तसेच सदर उपकरणासाठी येणारा खर्च वित्तीय वर्ष २००९-१० मधील "रुग्णालय उपकरणे खरेदी संकेतांक क्र.२९००/६२१/४१९०१६" मधील मंजूर तरतुदीतून करणेस ही सर्वसाधारण सभा कार्योत्तर मान्यता देत आहे.

इतिवृत्त मंजुरीची वाट न पाहता प्रशासनाने पुढील कार्यवाही करावी.

सुचक :- श्री. पांडूरंग पाटील

अनुमोदक :- श्री.हणमंत जगदाळे

<u>सर्वानुमते मंजूर</u>

**सही/- अशोक बारकू वैती**
**महापौर,**
**ठाणे महानगरपालिका, ठाणे.**

**प्रकरण क्रमांक २१७ :- छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयाच्या नेत्रपेढी विभागासाठी स्लिट लॅम्प उपकरण खरेदी करण्यास मा.सर्वसाधारण सभेची मान्यता मिळणेबाबत.**

**ठाणे महानगरपालिका ठराव क्रमांक १९७ दिनांक १७/०२/२०१०**

**ठ रा व :-**

प्रकरणी कागदपत्र व त्यावरील कार्यालयीन अहवाल पाहता, छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालय व राजीव गांधी वैद्यकीय महाविद्यालयाकडे परिपूर्ण नेत्रचिकित्सा विभाग असून, त्यात अधिव्याख्याता, सहाय्यक प्राध्यापक व प्राध्यापक असे नेत्ररोग तज्ञ कार्यरत आहेत. सदर विभागामार्फत नेत्र चिकित्सा, चष्मे व लेन्स यांचे नंबर देणे तसेच नेत्र शल्यचिकित्सा हे उपक्रम राबविले जातात. सदर विभागामार्फत राष्ट्रीय अंधत्व निर्मूलन कार्यक्रमांतर्गत मोतीबिन्दू व इतर शल्यचिकित्सा केल्या जातात.

प्रकरणी सदर विभागाच्या सेवांचे स्तर उंचावण्यासाठी विभागात नेत्रपेढीची सुविधा सुरु करणे अनिवार्य आहे. सदर उपक्रमासाठी राज्य आयोग सोसायटीकडून आधीच निर्देश प्राप्त झालेले आहेत.

प्रकरणी सदर नेत्रपेढीचे कामकाज अधिक प्रभावात्मक करण्यासाठी नेत्रपेढीलमध्ये SLIT LAMP WITH APPLANATION TONOMETER WITH (३ STEP MAGNIFICATION), DIGITAL PHOTOCAMERA AND PHOTOADAPTER या उपकरणाची नितांत आवश्यकता आहे.

सदर एका बायोकेमिस्ट्री ॲनॅलायजर उपकरणाची सर्व कर गृहीत धरता व ५ वर्षांची ए.एम.सी. धरता अंदाजे किंमत ९,९५,०००/- इतकी आहे.

तरी सदर उपकरणे खरेदी करणेसाठी तसेच सदर उपकरणासाठी येणा खर्च वित्तीय वर्ष २००९-२०१० मधील रुग्णालये उपकरणे खरेदी संकेतांक २९००/६२१/४१९०१६ मंजूर तरतूदीतून करणेस ही सर्वसाधारण सभा व वित्तीय मान्यता देत आहे.

प्रकरणी इतिवृत्त मंजूरीची वाट न पाहता प्रशासनाने पुढील कार्यवाही करावी असे ही सर्वसाधारण सभा सूचवित आहे.

सुचक : श्री.पांडुरंग पाटील

अनुमोदक : श्री.हणमंत जगदाळे

सर्वानुमते मंजुर......

**सही/- अशोक बारकू वैती**
**महापौर,**
**ठाणे महानगरपालिका, ठाणे.**

प्रकरण क्रमांक २१८ :- ठाणे महापालिकेचे सर्व दवाखाने,रुग्णालयांसाठी शस्त्रक्रियेचे साहित्य व सामुग्री खरेदी करण्यास मा.सर्वसाधारण सभेची कार्योत्तर मान्यता मिळणेबाबत.

**ठाणे महानगरपालिका ठराव क्रमांक १९८ दिनांक १७/०२/२०१०**

**ठराव :-**

प्रकरणी कागदपत्रे व त्यावरील कार्यालयीन अहवाल पाहता ठाणे महानगरपालिकेच्या सार्वजिनिक आरोग्य विभाग अंतर्गत कार्यरत असलेले छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालय, लोकमान्य टिळक नर्सिंग होम व निर्मला देवी दिघे रुग्णालय, कोरस, सर्व प्रसुतीगृहे, आरोग्य केंद्रे व दवाखाने यासाठी लागणारी आवश्यक शस्त्रक्रिया उपकरणे व साहित्य खरेदीचा प्रस्ताव सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत तयार करण्यात आला आहे. सदरच्या प्रस्तावानुसार येणारा खर्च रु. ७०,००,०००/- (अक्षरी रक्कम रु. सत्तर लाख मात्र) इतका अपेक्षित आहे. सदरचा खर्च सार्वजनिक आरोग्य विभागाच्या मध्यवर्ती औषधी भांडार विभागाकडील रुग्णालये उपकरणे खरेदी साठी असलेल्या २९००/६२१/४१९०१६ या लेखाशिर्ष अंतर्गत करण्यात येईल.

प्रशासनाने सदर प्रस्तावातील तांत्रिक बाबी व कायदेशीर बाजू तपासल्या आहेत व त्या योग्य व कायदेशीर आहेत असे गृहीत धरुन ही सर्व साधारण सभा सदर प्रस्तावातील खरेदीस व त्या करिता येणा-या रु. ७०,००,०००/- (अक्षरी रु. सत्तर लाख मात्र) खर्चाला हि सर्वसाधारण सभा कार्योत्तर मान्यता देत आहे.

प्रकरणी इतिवृत्त मंजुरीची वाट न पाहता प्रशासनाने पुढील कार्यवाही करावी असे ही सर्वसाधारण सभा सूचवित आहे.

सुचक : श्री.पांडुरंग पाटील अनुमोदक : श्री.हणमंत जगदाळे

सर्वानुमते मंजुर......

**सही/- अशोक बारकू वैती**
**महापौर,**
**ठाणे महानगरपालिका, ठाणे.**

## मा.महासभेतील चर्चेच्या अनुषंगाने पारित करण्यांत आलेला ठराव.

## ठाणे महानगरपालिका ठराव क्रमांक १९३ दिनांक १७.२.२०१०

**ठ रा व :**

जगातील सर्वात प्रतिष्ठीत समजल्या जाणा-या ॲरनॉल्ड ॲम्युच्युअर इंटरनॅशनल बॉडी बिल्डींग चँपियनशिप स्पर्धा अमेरिका येथील कोलंबस,ओहिओ येथे दिनांक ४ ते ६ मार्च २०१० या कालावधीत संपन्न होणार आहे. सदर स्पर्धेकरीता ठाणे शहरातील एकमेव श्री.सुहास मधुकर खामकर (शिवछत्रपती पुरस्कार विजेता) यांची निवड झालेली आहे.

वरील जागतिक स्पर्धेसाठी संपूर्ण महाराष्ट्रातून श्री.सुहास खामकर यांची निवड झालेली असुन ही बाब ठाणे शहरासाठी खरोखरच भूषणावह व अभिमानाची आहे, परंतू सदर स्पर्धेत सहभागी होण्यासाठी सदर खेळाडूस आर्थिक मदतीची नितांत आवश्यकता आहे.

सबब श्री.सुहास खामकर यांना वरील जागतिक स्पर्धेस सहभागी होण्यासाठी व प्रोत्साहनार्थ ठाणे महानगरपालिकेकडून रक्कम रुपये १,५०,०००/- (अक्षरी रक्कम रुपये एक लाख पन्नास हजार ) मात्र आर्थिक सहाय्य करण्यासाठी ही महासभा ठरवित असुन सदर प्रकरणी प्रशासनाने इतिवृत्तांत मंजुरीची वाट न पाहता पूढील कार्यवाही करण्यासाठी सुचवित आहे.

सर्वानुमते मंजूर.

सूचक : श्री.पांडुरंग पाटील. — अनुमोदक : श्री.हणमंत जगदाळे.

सही/-श्री.अशोक बारकु वैती.
महापौर,
ठाणे महानगरपालिका,ठाणे.

# दुखवटा ठराव

ठाणे महानगरपालिका ठराव क्र. २०३, दिनांक : १७/०२/२०१०

**ठ रा व :-**

ठाणे महानगरपालिकेचे माजी उपमहापौर श्री.भालचंद्र तांगडी यांचे मंगळवार दि.१६ फेब्रुवारी २०१० रोजी त्यांच्या राहत्या घरी दुःखद निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, मुले असा परिवार आहे.

श्री.भालचंद्र तांगडी यांची एक समाजसेवक म्हणून ओळख होती. तळागाळातील गरीब लोकांना मदत करीत असतांना त्यांना नागरिकांनी नगरसेवक म्हणून महानगरपालिकेवर निवडून पाठविले. त्यानंतर त्यांनी उपमहापौर पदही भुषविले आहे. अत्यंत मनमिळावू, मितभाषी असलेले श्री.तांगडी हे लोकप्रिय होते. त्यांच्या निधनाने ठाणे शहरात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.

कै.भालचंद्र तांगडी यांच्या निधनामुळे त्यांच्या कुटुंबियांवर दुःखाची कु-हाड कोसळली आहे, हे दुःख त्यांच्या कुटुंबियांना सहन करण्याची ताकद परमेश्वर देवो. तसेच त्यांच्या आत्म्यास चिरशांती व सद्‌गती लाभो अशी ईश्वर चरणी प्रार्थना करुन ही सर्वसाधारण सभा त्यांना साश्रूनयनांनी श्रध्दांजली अर्पण करीत आहे.

**सूचक : श्री.पांडुरंग पाटील** **अनुमोदक : श्री.हणमंत जगदाळे**

**सही/- अशोक बारकू वैती**
**महापौर,**
**ठाणे महानगरपालिका, ठाणे.**

## दुखवटा ठराव

ठाणे महानगरपालिका ठराव क्र. २०४, दिनांक : १७/०२/२०१०

**ठ रा व :-**

शनिवार दि.१३ फेब्रुवारी २०१० रोजी पुणे येथील कोरेगाव पार्क मधील जर्मन बेकरीमध्ये अतिरेक्यांनी केलेल्या भ्याड बॉम्ब स्फोट घडवून आणला. यामध्ये अंदाजे १० व्यक्ती मृत पावले असून, अनेक निष्पाप नागरिक नागरिक जखमी झालेले आहेत. त्यातील काहींची प्रकृती चिंताजनक असून, मृतांचा आकडा वाढण्याची शक्यता आहे. हा स्फोट एवढा भिषण होता की, जर्मन बेकरीतील सर्व साहित्य बेचिराख झाले, बेकरीच्या आसपास रक्ताचा सडा पसरला. जखमींना जहांगिर व ससून हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले असून, मृतांमध्ये ४ परदेशी नागरिकांचा अंतर्भाव आहे. सदर भ्याड हल्ल्याचा ही सर्वसाधारण सभा जाहिर निषेध करीत आहे.

तसेच या हल्ल्यामध्ये नाहक बळी पडलेल्या मृत व्यक्तींच्या आत्म्यास चिरशांती व सद्गती लाभो अशी ईश्वर चरणी प्रार्थना करुन ही सर्वसाधारण सभा त्यांना साश्रूनयनांनी श्रध्दांजली अर्पण करीत आहे. तसेच जखमी व्यक्तींच्या आरोग्यात सुधारणा व्हावी अशी ही सर्वसाधारण सभा ईश्वर चरणी प्रार्थना करीत आहे.

**सूचक : श्री.पांडुरंग पाटील** **अनुमोदक : श्री.हणमंत जगदाळे**

**सही/- अशोक बारकू वैती**
**महापौर,**
**ठाणे महानगरपालिका, ठाणे.**

( सभागृहात श्रध्दांजली अर्पण करण्यात येते. )
( तद्नंतर मा.महापौर सो. दुपारी १.०० वा. सभा तहकूब झाल्याचे जाहिर करतात.)

**महापौर,**
**ठाणे महानगरपालिका, ठाणे.**

सभा तहकूब झाल्याची वेळ : दुपारी १.०० वा.
दिनांक : १७/०२/२०१०
महापालिका सचिव कार्यालय,
ठाणे महानगरपालिका, ठाणे.

**( सौ.छाया मानकर )**
महापालिका सचिव,
ठाणे महानगरपालिका, ठाणे.

| | |
|---|---|
| १६८ | १. |
| १६९ | २. |
| १७४ | ३. |
| १७५ | ४. |
| १८१ | ५. |
| १९८ | ६. |
| २१४ | ७. |
| २१५ | ८. |
| २१६ | ९. |
| २१७ | १०. |
| २१८ | ११. |
| आ.वे.ठराव सुहास खामकर | १२. |
| दुखवटा ठराव | १३. |
| दुखवटा ठराव | १४. |